वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# खंडणी प्रकरणाचं सत्य तीन दिवसात समोर

## कुणाकुणाची नावं घेणार? सुदर्शन घुले घडाघडा बोलणार



बीड (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि आवादा कंपनीकडून २ कोटींची खंडणी उकळण्याच्या गंभीर प्रकरणात अटक केलेल्या सुदर्शन घुलेला न्यायालयाने तीन दिवसांची सीआयडी पोलीस कोठडी सुनावली आहे. यामुळे या खंडणी प्रकरणातील वस्तुस्थिती आणि हत्या प्रकरणाची धागेदोरे समोर येणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाइंड आणि अवादा कंपनीकडून २ कोटींच्या खंडणीचा प्रमुख आरोपी सुदर्शन घुले याला हत्या प्रकरणात न्यायालय कुठली झाली होती. त्यांनंतर सीआयडीने आज पुन्हा ताब्यात घेऊन केज न्यायालयात हजर करण्यात आले. सीआयडीने घुलेच्या चौकशीसाठी पाच दिवसांची कोठडी मागितली होती, मात्र न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. आरोपीच्या विरोधात गंभीर पुरावे आहेत. त्याच्या चौकशीत आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे. ————————

Email.- dailydivyawarta@Gmail.com

Email.-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

सुदर्शन गोल्याची खंडणी प्रकरणातील पोलीस कोठडी अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. कारण आवादा कंपनीला २९ तारखेला खंडणी मागण्यासाठी सुदर्शन घुले मस्साजोग येथील प्लांटवर गेला होता.. तसेच विष्णू चाटेच्या ऑफिस मधील सीसीटीव्ही फुटेज मध्ये देखील सुदर्शन घुले आहे. त्यामुळे खंडणी प्रकरणाचे मुख्य सूत्रधार कोण आणि कुणाच्या सांगण्यावरून खंडणी मागितली गेली हे सुदर्शन घुलेच्या तीन दिवसाच्या पोलीस कोठडीत



सत्य बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.सीआयडीकडून आरोपी सुदर्शन घुलेची कसून चौकशी सुरू आहे. आता या तीन दिवसांत नवे धागेदोरे हाती लागतात का? आणि या गूढ प्रकरणात आणखी कोणकोण सामील आहे? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.आरोपी सुदर्शन घुले याच्या मोबाईलमधील डेटा रिकव्हर झाला आहे. तसेच विष्णू चाटेच्या मोबाईलमधील डेटा देखील सीआयडीने शोधला आहे. त्यामध्ये महत्त्वाची माहिती मिळाली आहे.

## टीप देणारा तो पोलीस कोण? संतोष देशमुखांना मारल्यानंतर सगळे स्कॉर्पिओ सोडून पळाले

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातला आरोपी पळून जातानाचा व्हिडीओ समोर आला आणि मोठी खळबळ उडाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या व्हिडीओनंतर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा सवाल उपस्थित होत आहे. यानंतर संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी देखील गंभीर आरोप केला आहे. आरोपीला पळून जाण्यासाठी टीप पोलिसांनीच दिल्याचा संशय धनंजय देशमुख यांनी केला आहे. तसेच हत्येच्या दिवसापासून सहा दिवसात पोलिसांनी काय काय तपास केला यांची सखोल चौकशी केली पाहिजे, असेही ते म्हणाले. ते बीडमध्ये बोलत होते.संतोष देशमुखांचे मारेकरी भर रस्त्यात गाडी लावून गाडीतून उतरून पळून गेले. यावेळी हाकेच्या अंतरावर पोलीस होते. गाडीचा पाठलाग हे पोलीस करत होते. मग हे आरोपी का सापडले नाहीत? पोलिसांच्या अभयामुळेच आरोपी मोकाट आहेत . पुढे पोलीस आहेत याची टीप आरोपींना कोणी दिली. तो पोलीस कर्मचारी होता का? असा संशय धनंजय देशमुखांनी व्यक्त केला आहे.

# परळीत धनंजय मुंडे समर्थकावर कारवाई

# कैलास फडवर गुन्हा दाखल

परळी, (दिव्य न्युज):- विधानसभा निवडणुकीवेळी धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता कैलास फड याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्याला मारहाण केली होती. या प्रकरणी त्याच्यावर दोन महिन्यांनंतर पोलिसांनी कारवाई केली. कैलास फडच्या विरोधात परळी शहर पोलिस ठाण्यामध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल झाला आहे.

मतदानाच्या दिवशी कैलास फडने परळीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यासोबत असणाऱ्या माधव जाधव यांना मारहाण केली होती. याबाबतचा व्हिडिओही व्हायरल झाला होता. मात्र अद्याप फड विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. आता अखेर पोलिसांनी कैलास फडला दणका देत त्याच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

विधानसभा निवडणुकीदरम्यान परळी मतदारसंघात अनेक वादाच्या घटना घडल्या होत्या. राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय



मुंडे यांच्या कार्यकर्त्यांकडून अनेक गैरप्रकार करण्यात आल्याचा आरोप शरद पवारांच्या राष्ट्रवादीने केला होता. त्यातच २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानादिवशी कैलास फड आणि त्याच्या साथीदाराने शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुखांचा कार्यकर्ता माधव जाधव यांना मारहाण केली होती. परळी शहरातील बँक कॉलनी परिसरात हा प्रकार घडला होता. याप्रकरणी माधव जाधव यांनी पोस्टाद्वारे तक्रार नोंदवली होती. याच प्रकरणात राजेसाहेब देशमुख यांच्यासोबत असलेल्या पोलिस गार्डचा जबाब घेण्यात आला. त्यानुसार कैलास फडच्या विरोधामध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र गुन्हा नोंदवण्यास एवढा विलंब का लावला? असा सवाल देखील उपस्थित होत आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ च्या मतदानादरम्यान परळी विधानसभा मतदारसंघांत बोगस मतदान होत असल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे. यादरम्यान परळी शहरातील बँक कॉलनी परिसरातील मतदान केंद्रावर राजेसाहेब देशमुख मतदान केंद्रातील माहिती घेत असताना माधव जाधव यांना तीन ते चार जणांनी मारहाण केली. माधव जाधव यांना परळी मध्ये मारहाण झाल्यानंतर त्याचे पडसाद घाटनांदुर येथे उमटले होते. घटनांदूर येथे मतदान केंद्रात मतदान चालू असतानाच काही कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रात घुसून तोडफोड केली होती.

मागील वर्षी दिवाळी दरम्यान परळीच्या बँक कॉलनीतील घराजवळ वाहन पूजा करत असताना एका तरुणाने रिव्हॉल्व्हरमधून हवेत फायरिंग केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी कैलास फड याच्यावर काही दिवसांपूर्वी परळी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. तसेच त्याला अटकही झाली होती

संतोष देशमुख हत्या प्रकरण उजेडात आल्यानंतर बीड पोलिसांनी गुन्हेगारांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत आतापर्यंत ३१० शस्त्र परवाने रद्द करण्याचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. या प्रस्तावानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी पहिल्या टप्प्यात १००, दुसऱ्या टप्प्यात ६०, तिसऱ्या टप्प्यात २३, तर चौथ्या टप्प्यात १२७ परवाने रद्द करण्यात आलेत. शस्त्र परवाने रद्द करण्याचा आकडा ५०० वर जाण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

# बज़्मे सफीरान -ए -उर्दू च्या वतीने गेवराई येथे पहिल्यांदा उर्दू कवी संमेलन



गेवराई , (दिव्य न्युज):-प्रख्यात भाषाशास्त्रज्ञ, सुलेखक, उर्दू भाषेचे गाढे अभ्यासक ,दिवंगत डॉ. सय्यद इस्माईल अहमद यांच्या दहाव्या पुण्यतिथी निमित्त नवीन पिढींना त्यांच्या कार्याशी अवगत करण्यासाठी व त्यांना श्रद्धांजली अर्पित करण्यासाठी बज़्मे सफिरान -ए -उर्दू च्या वतीने एक कवी संमेलनाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. मिल्लत इंग्लिश स्कूलच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये आयोजित हा साहित्यिक कार्यक्रम दोन सत्रांमध्ये पार पडला .पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी इब्राहिम अनवरी हे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध साहित्यिक ,नाट्य लेखक ,कवी ड सुभाष निकम ,काझी शमीम, मुख्याध्यापक सय्यद वाजेद हे होते .बज़्मच्या वतीने अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या सत्कार करण्यात आला. हसन इनामदार यांच्या कुरान पठण व सय्यद फारूक अहमद यांच्या नात ने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पाहुण्यांचे हस्ते बज़्मच्या बोधचीन्हांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मिल्लत इंग्लिश स्कूल चे प्राचार्य सय्यद इरफान आज़म, मोहम्मद तारेक ,सय्यद वाजेद, काजी शमीम, ड सुभाष निकम यांनी

▶▶ पान २ वर

# पंतप्रधान नरेंद्र मोदींची अल्पसंख्याक समाजाला साद ; सर्वांनी भाजपा सदस्य होऊन विकासाच्या प्रवाहात यावे

## मुंडे साहेबांमुळे जिल्हावाशीयांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले - जमाल सिद्दिकी, मुलतानी

बीड , (दिव्य न्युज):- देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी मुस्लिम समाजाला साद दिली होती आपण भाजपा कार्यालयात येवून कबजा करावे भारतीय जनता पार्टीचे सद्या देशभरात नोंदणी सुरु असून सर्व अल्पसंख्यक बांधवानी भाजपा सदस्य नोंदणी करून मोदि यांच्या आवाहनाला प्रतिसाद द्यावा स्वर्गीय लोकनेते



गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे बीड जिल्ह्यात रेल्वे आणण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडे व प्रीतम ताई मुंडे यांनी विशेष प्रयत्न केले. केंद्र व राज्य सरकार कडे पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला म्हणूनच बीड जिल्ह्या वासियांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले असे विचार अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दिकी यांनी व्यक्त केला. अल्पसंख्यांक मोर्चा च्या बैठकीत

▶▶ पान २ वर

# डॉ.जाकेर हुसेन यांच्या जयंती निमित्त अमन लॉन्स बीड येथे अखिल भारतीय कवी संमेलन

बीड , (दिव्य न्युज):- अखिल भारतीय उर्दु कवी संमेलनाचे आयोजन दि ०८ फेब्रुवारी वार शनिवार रोजी अमन लान्स बार्शी रोड बीड येथे सायं ०७:०० ते रात्री १०:०० वा.पर्यंत करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात हाफेज मोहम्मद कासिम अन्सारी यांनी कुराण मजीद पठन करुन केली.हम्द व नात ए पाक शेर-ए-हिंद ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा यांनी पठन केले.या कवी



संमेलना मध्ये अखिल भारतीय सुप्रसिद्ध कवी नईम अख्तर खादमी बुरहानपुर ( चझ ),राहत इंदौरी यांचे पुत्र सतलज राहत इंदौरी ( इंदोर ),ताहेर सऊद बिजनौर ( णझ ),कलीम जावेद खिरतपुरी( णझ ),बीडचे प्रसिद्ध कवी शाहनवाज खान आझाद,अलतमश तालेब नांदेड,जुबेर गोहर परभणी या सर्वांनी गजल,कविता,शायरी केली व सुत्रसंचालन ऐहतेशाम सफ़ी परभणी यांनी केले.हा कवी संमेलन फारोख अली पटेल साहेब माजी उपनगराध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलं. या वेळी प्रमुख पाहुणे मोईन मास्टर साहेब, शफीख भाऊ ,शेख तय्यब भाई संपादक बीड रिपोर्टर,पठाण जलील खाँन,पठाण जैतुल्लाह

▶▶ पान २ वर

# दुचाकींच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

केज , (दिव्य न्युज):-शहरातील कानडी कॉर्नर वरील भगवान बाबा चौकामध्ये रविवार (दि.९) रोजी रात्रीच्या सुमारास दोन दुचाकीच्या झालेल्या अपघातामध्ये एका ४२ वर्षीय तरुणाचा मृत्यु झाला.

केज शहरातील नाभिक संघटनेचे संघटक रामरतन मारुती गवळी हे रविवार (दि.९) रोजी रात्री बस स्टॅन्ड कडून कानडी चौकात आले असता कानडी रोडकडे वळताना छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून आलेल्या अन्य एका दुचाकीची रामरतन गवळी यांच्या दुचाकीला धडक बसली. यामध्ये रामरतन गवळी हे गंभीर जखमी झाले आणि त्यातच त्यांचा मृत्यु झाला. तर अन्य दोघे जखमी झाले आहेत. दरम्यान, सदरील अपघातामध्ये सचिन दशरथ मुळे आणि हनुमंत भागवत काकडे (रा.साबला ता. केज) हे दोघे जखमी झाले असून अंबाजोगाई येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# विद्युत रोहित्र आणि खांबांचे चर कॉंक्रीटीकरणाच्या प्रतीक्षेत

## गतिरोधक, चर व पार्किंग ने नागरिक वैतागले - एस.एम.युसूफ़

बीड , (दिव्य न्युज):-आसेफ़नगर च्या मुख्य रस्त्यावरील विद्युत रोहित्र आणि खांबांचे चर कॉंक्रीटीकरणाच्या प्रतीक्षेत असून या रस्त्यावरील गतिरोधक, चर व पार्किंग ने नागरिक अक्षरशः वैतागले असल्याचे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, शहरातील आसेफ़नगरच्या मुख्य डीपी रस्त्यावरील विद्युत रोहित्र आणि खांबाचे चर जवळपास गेल्या तीन महिन्यांपासून कॉंक्रीटीकरणाच्या प्रतीक्षेत आहेत. यामुळे येथे एखादा मोठा अपघात झाल्यावरच सोडलेल्या चरांचे कॉंक्रिटीकरण होणार

▶▶ पान २ वर






# क्रांतिकारी शिक्षक संघटनेतर्फे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा

बीड , (दिव्य न्युज):- क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य ही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये गेल्या एक दशकापासून उत्कृष्ट कामगिरी करत आहे संघटनेतर्फे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या सोडण्यात यश आले आहे तसेच गेल्या एक दशकापासून शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक व प्राध्यापक यांना मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्काराने दरवर्षी सन्मानित केले आहे तसेच यावर्षीही अध्यापनामध्ये व



शिक्षणाचा दर्जा गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करत असलेले आदर्श शिक्षक, प्राध्यापक यांना गौरविण्यासाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता नीलकमल हॉटेल नगर रोड बीड येथे खूप थाटात संपन्न झाला. या आदर्श शिक्षक सोहळ्यात महाराष्ट्रातील मराठी व उर्दू माध्यमाचे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मेहनती व शैक्षणिक कार्यात उकृष्ट कामगिरी करणाऱ्या २२ शिक्षक,मुख्याध्यापक यांना गौरविण्यात आले. यावेळी श्री शाहिद कादरी सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात खूप महत्वाचे मुद्दे उचलले.

१.राज्यातील प्रत्येक शाळेला ५ दिवसीय आठवडा करून शनिवार रविवार सुट्टी जाहीर करावी. २.शासकीय कार्यालयाचे वेळे नंतर एकही कर्मचारी कार्यालयात थांबू नये याचा नियम झाला पाहिजे. ३. १२ व २४ वर्षाचे ग्रेड

▶▶ पान २ वर

## सय्यदमीर बाबा विद्यालय लोणी.स यांचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम



पिंपळा, (दिव्य न्युज):– आष्टी तालुक्यातील लोणी.स येथे सय्यदमीर बाबा विद्यालय शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.मुलांच्या कलागुणांचा प्रत्यक्ष विकास व्हावा यासाठी सय्यदमीर बाबा विद्यालय लोणी.स यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन १० फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.सुभेदार विष्णू पवार हे होते.यावेळी प्रस्ताविक भाषण करताना शाळेचे मुख्याध्यापक शिंदे सुरेश सर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा आम्ही दरवर्षीच सत्कार करतो विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यालय मध्ये वर्षभर विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जादा तास घेऊन विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यात येते असे प्रास्ताविक भाषणामध्ये बोलताना सांगितले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी मंचावर उपस्थित ज्येष्ठ नागरिक मोहन तात्या वाळके.आजिनाथ काका बेल्हेकर.शंकर राजे निंबाळकर.सरपंच संजय रक्ताटे.युवराज खटके.सुभाषशेठ वाळके.निळकंठ रक्ताटे.शरद माखनकर ग्रा.पं.सदस्य.अक्षय सावरे.मेघा चिंतामणी.मनीषा रक्ताटे.शंकर आबदार.गणेश निंबाळकर.ग्रा.पं.सदस्य.सुभाष सासवडे.संतोष तात्या वाळके छबुराव देवकर.श्याम खोमणे.अंबादास वाळके.बाबासाहेब रक्ताटे.किरण परदेशी.शिरोळे सर.संदिप लांडगे.गुलाब रक्ताटे.भैरवनाथ वाळके.आजिनाथ जगधने.शिवाजी डाहळे.सर्व शिक्षक व शिक्षकेइतर कर्मचारी या कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांनी मेहनत घेतली. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

# आडूळला होणार बारावीपर्यंत उर्दू शाळा

## मुलींना शिक्षण प्रवाहात आणणार, मौलाना हजरत हुजेफा वस्तानवींची माहिती

पाचोड, (दिव्य न्युज):– पैठण तालुक्यातील आडूळ येथील मदरशात मुस्लिम समाजातील मुलींसाठी उर्दू माध्यमाची इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतची शासनमान्य शाळा सुरू करण्यात येईल. त्यामुळे मुलींना मराठी व इंग्रजी भाषेतही शिक्षण घेता येईल, असे देशातील मुस्लिम समाजाची सर्वांत मोठी शिक्षण संस्था असलेल्या जामिया इस्लिमिया अक्कलकुआचे व्हाइस चेअरमन मौलाना हजरत हुजेफा वस्तानवी यांनी सांगितले. आडूळ येथील हजरत आयेशा सिद्दीकी (रजी.) या मदरशात आयोजित स्नेहसंमेलन, उस्मानिया किचन हॉलच्या भूमिपूजनप्रसंगी सोमवारी (ता. दहा) ते बोलत होते.

मौलाना हजरत हुजेफा वस्तानवी पुढे म्हणाले, देशातील मुस्लिम समाज शैक्षणिक क्षेत्रात खूप मागे आहे. मुस्लिम समाजाने भवितव्य लक्षात घेऊन त्यांना शिक्षणाबरोबर व्यवसायिक व धार्मिक शिक्षण देणे गरजेचे आहे. मुलगी शिकल्यास ती सर्व कुटुंबाला शिक्षित करते. त्यामुळे येथील मदरशात आडूळसह परिसरातील मुलींना धार्मिक व व्यवसायिक शिक्षणाबरोबर शासनाचे उर्दू माध्यमाचे शिक्षण घेता यावे, यासाठी लवकरच शासनमान्य शाळा सुरू करण्यात येईल. शिवाय, मुलींना उच्च दर्जाचे जेवण मिळावे, यासाठी उस्मानिया हॉलचे काम



लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर मौलाना हजरत हुजैफा वस्तानवी, मौलाना जाविद पटेल, मौलाना शमशुद्दीन कारी, मौलाना सुलतान इशाती, हाजी जब्बार बागवान, फेरोज पटेल, मौलाना अब्दुल रहेमान मोहम्मदी, मौलाना मुजिब उर रहेमान, मौलाना सय्यद असरार कारी, हाजी मुक्तार मौलाना हाजी बाबुभाई बागवान, यांची प्रमुख उपस्थिती होती. यशस्वितेसाठी येथील सर्व मुस्लिम समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

उस्मानिया हॉलची घोषणा होताच जागा दान, तीस लाखांची वर्गणी

मदरशातील मुलींची चांगल्या प्रकारे जेवणाची व्यवस्था व्हावी, यासाठी किचन हॉल उभारण्यात येणार असल्याची घोषणा होताच येथील आयुब्ब पठाण यांनी त्यांच्या मालकीची ४० लाख रुपये किमतीची तीन गुंठे जागा मदरशाला मोफत दिली. तर, हॉलच्या बांधकामासाठी पिंप्रीराजा येथील मोसंबीचे व्यापारी हाजी जब्बार बागवान यांनी २० लाख व येथे उपस्थितांनी अवघ्या १५ मिनिटांत बांधकामासाठी १० लाख रुपये, असे ३० लाख रुपये वर्गणी जमा केली.

मदरशातील ४० विद्यार्थिनींना पदविका प्रमाणपत्रासह मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. आता येथे उर्दू माध्यमाची शाळा सुरू होणार असल्याने येथे शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिक्षण क्षेत्रातही भविष्य घडविण्याची संधी मिळणार आहे.

पान १ वरून

## बज़मे सफीरान –ए

डॉ.सय्यद इस्माईल अहमद यांच्या भाषेच्या ज्ञानप्रसारा विषयी कार्य व त्यांच्या जीवनाचे अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. मोहम्मद इब्राहिम अनवरी यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर पहिला सत्र संपन्न झाला.या सत्राचे सूत्रसंचालन सय्यद मुज्तबा नजम यांनी केले.

दुसरा सत्र बहारदार कवी संमेलनाच्या होता.यामध्ये प्रसिद्ध कवींनी आपल्या काव्यरचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली. काझी मुजीबुररहमान यांनी आपली कविता व व्यंग रचना सादर केली. हसीन अख्तर यांनी कविता सादर करून उपस्थितांची वाहवाह मिळवली. सय्यद वाजेद यांनी आपल्या कवितेने उपस्थितांना एकतेच्या संदेश दिला. प्रसिद्ध उर्दु कवी गुलाम साकिब यांनी आपल्या कविता व चारोळ्या सादर केले ज्यांना रसिकांनी खूप प्रतिसाद दिला.

प्रसिद्ध शायर सय्यद मुज्तबा नजम यांनी गज़ल सादर करून एक वातावरण निर्माण केलं. नवोदित कवी रगीबुररहमान इनामदार यांनी आपल्या गज़ल सादर केले. गज़लच्या प्रत्येक शेर ला उपस्थितांनी पुन्हा पुन्हा ऐकलं. औरंगाबादचे प्रसिद्ध युवा उर्दू शायर सय्यद फारूक अहमद यांनी आपल्या मधुर शैलीत गज़ल सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. रगीबुररहमान इनामदार यांनी या कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन केले.सय्यद मुज्तबा नज्म यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी असलम अनवरी, बदर इंटरनॅशनल स्कूलचे कार्यवाहक मोमिन एजाज़ , डॉक्टर शेख सोहेल, शेख अरबाज, हाफिज़ आलम , फारुकी रब्बानी, कुरेशी अज़हर, सय्यद रिज़वान व शिक्षक व साहित्य रसिक प्रेमी बहुसंख्येत उपस्थित होते.

## डॉ.जाकेर हुसेन

खाँन,हाजी नसीम इनामदार,खुर्शीद आलम साहेब,बरकत लाला,मुख्तार काँट्रॅक्टर,सय्यद मजहर भाई,सरपंच सय्यद शाहेद भाई,अमर शेख सर,हाशम पठाण खामगावचे अमीर साहेब,शाहीन पठाण अध्यक्षा क्रांती म.अ.का. यु.म.राज्य,शेख गुलरुख जहिन उपस्थित होते.हा उर्दु कवी संमेलन भारताचे ३ रे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.जाकेर हुसेन यांच्या जयंतीनिमित्त ठेवण्यात आले होते.या कवी संमेलनाचे आयोजन बीड शहराच्या तरुण मंडळींनी केले होते. या उर्दु कवी संमेलनाला यशस्वी करण्यासाठी बीडचे कवी शाहनवाज खान आझाद,शेर–ए–हिंद ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा,शेख इलियास युनुस,फयाज कुरेशी,शेख अनिस यांनी परिश्रम घेतले व आभार प्रदर्शन शाहनवाज खान यांनी केले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींची

बोलताना त्यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रातील तमाम कार्यकर्त्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे नेतृत्व होते. मुंबई येथील हजहाऊस बांधताना मुंडे साहेबांनी मोठी मदत केली मुंडे साहेबांनी अल्पसंख्यांक समाजासाठी मोठे कार्य केले गोपीनाथ मुंडे कायम स्मरणात राहतील पंतप्रधान नरेंद मोदी सद्या देशभरात सब का साथ सब का विकास सब का विश्वासाला धरून विकास करत आहेत..याप्रसंगी अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, प्रदेश महामंत्री,सलीम जहांगीर भाजपाचे जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे, हे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मुलतानी यांनी केंद्र व राज्य सरकार अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी अनेक योजना राबवत असून या योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत व सक्रियपणे भाजपा सदस्य नोंदणीत सहभाग घ्यावा असे आवाहन केले. यावेळी प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर , प्रदेश उपाध्यक्ष दौलत पठाण, बाबा पठाण, अतीक पटेल,परभणी जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, नूर लाला खान, रफिक कुरेशी,रियाज सिद्दीकी,मोहम्मद सलिम अत्तार,सलिम जहागीरदार, आडू जहगिरदार, उपस्थीत होते.

## विद्युत रोहित्र आणि

काय? येथील चरांचे काँक्रिटीकरण करणे आवश्यक असताना ते करण्यात येत नाहीये मात्र याच रस्त्यावर तसेच शहरात जिथे नवीन सिमेंट काँक्रीटचे रस्ते तयार करण्यात येत आहेत, त्या रस्त्यांवर सर्रासपणे अत्यंत तापदायक आणि त्रासदायक असे सिमेंट काँक्रीटचे उंच उंच डोंगरांसारखे गतिरोधक टाकण्यात येत आहेत. आसेफ़नगर मध्ये तयार करण्यात आलेला हा डीपी रस्ताही याला अपवाद राहिला नाही. येथेही गतीरोधकांचा अक्षरशः सुळसुळाट करून टाकण्यात आला आहे. कुठे पूर्ण लांबीचे तर कुठे अर्धवट लांबीचे गतिरोधक टाकण्यात आले आहेत. मात्र याचे कुठलेही सोयरसुतक बीड नगर परिषद तसेच जिल्हा प्रशासनाला असल्याचे दिसत नाही. तसेच अनावश्यक गतिरोधके टाकण्याकरिता सिमेंट काँक्रीट चा भरमसाठ ऊत आल्याचे दिसत आहे. या सर्व बाबी पाहता बीड नगर परिषद आणि जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष देऊन येथे सोडण्यात आलेले विद्युत रोहित्र तसेच विद्युत खांबांचे चर काँक्रिटीकरणाने भरणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेले प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## क्रांतिकारी शिक्षक

प्रत्येक शिक्षकाला मिळाले पाहिजे. ४. प्रत्येक शिक्षकाला आरोग्य कार्ड प्रदान केले पाहिजे. ५.पी एच डी व एम फाईल धारक शिक्षकांना अगाव वेतन वाढ देण्यात यावे. ६. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत विषय साधनव्यक्ती यांना त्यांचे सेवेत कायम करावे व गरजू कर्मचाऱ्यांचे आंतरजिल्हा बदली करण्यात यावी. पगारवाढ करण्यात यावी ७.शिक्षकांना अशैक्षणिक कामापासून मुक्त करून पूर्ण वेळ वर्गात अध्यापन करण्याची संधी द्यावी. ८.शिक्षकांना जुनी पेन्शन योजना, पगार वाढ. सदरील कार्यक्रमात पुरस्कार सोहळ्यात अनेक मान्यवरांनी शिक्षण व शिक्षकांविषयी आपापले मत मांडले. या सोहळ्यात कर्मचारी, अधिकारी यांनी आपापली बाजू मांडली. या कार्यक्रमाचे उद्घाटक मा आमदार अमरसिंह पंडित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर नरेंद्र काळे, फारुख पटेल व इतर उपस्थित होते, शाहीद कादरी यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे शेवटी खान असरार सर यांनी सर्व उपस्थितींचे आभार मानले.


